Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

## SPECIAL ISSUE
## "INDIAN FOREIGN POLICY AND PRESENT SCENARIO"

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादी चळवळ : एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. विनोद एन. बैरागी**<br>**प्रा. बी. एस. यादव** | ५६-५८ |
| १४ | भारत व रशिया संबंध<br>**डॉ. संतोष कोल्हे** | ५९-६१ |
| १५ | भारताचे परराष्ट्र धोरण व सार्क<br>**प्रा. संध्या पेंडकर / देशपांडे** | ६२-६७ |
| १६ | भारताचे परराष्ट्र धोरण आणि सद्यस्थिती<br>**अश्विनी भास्करराव बनकर** | ६८-७० |
| १७ | संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात भारताची भूमिका<br>**परमेश्वर मुक्तीराम माने** | ७१-७५ |
| १८ | भारताचे परराष्ट्र धोरण आणि लोकसंख्यावाढ<br>**प्रा. वनन परसराम आमले** | ७६-८० |
| १९ | भारताचे परराष्ट्र धोरण : आपत्ती व्यवस्थापन<br>**सुशिलकुमार शिंदे** | ८१-८३ |
| २० | भारत - श्रीलंका संबंध<br>**प्रा. गौतम कांबळे** | ८४-८६ |
| २१ | भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावाद<br>**प्रा. वसंत रामसिंग पवार** | ८७-९० |
| २२ | लोकसंख्यावाढ: भारतासमोरील अघोरी समस्या<br>**अनिल संपतराव जाधव** | ९१-९५ |
| २३ | भारताचे परराष्ट्र धोरण व आव्हाने<br>**प्रा. विशाल भगवान कुंभार** | ९६-१०१ |
| २४ | भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादाची पार्श्वभुमी<br>**प्रा. डॉ. काळे आर. के.** | १०२-१०९ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २४. भारताचे परराष्ट्र धोरण आणि अलिप्ततावादाची पार्श्वभुमी

**प्रा. डॉ. काळे आर. के.**
विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना**

२० वे शतक हे जसे लोकशाहीसाठी सुवर्णयुग ठरले तसेच २० व्या शतकात दुसऱ्या महायुद्धानंतर झालेले निरवसाहतिकरण स्वातंत्र सार्वभौम नवद्वित राष्ट्राचा उदय यांनी जागतिक राजकारणावर बहुआयामी दुरगामी परिणाम टाकला. त्याच बरोबर विविध विचार तथा चळवळींनी प्रत्येक देशाचे परराष्ट्रधोरण ढवळुन निघाले यातिलच एक विचार आणि चळवळ म्हणजे अलिप्ततावाद चळवळ होय. दुसऱ्या महायुद्धा नंतर जागतिक राजकारणामध्ये शितयुद्धाने जी व्यवस्था द्विध्रुविय व्यवस्था निर्माण केली त्या उत्तर साम्राज्यवादी विचारावर काढलेला तोडगा किंवा पर्याय म्हणता येईल. या चळवळीमध्ये आदर्श आणि व्यवहारीकता यांचा सुयोग्य मेळ घालण्याचा प्रयत्न म्हणजे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी पुढाकार घेतला. त्यासाठी नासेर व टिटो यांनी नेहरूंच्या विचारांना पाठींबा दिला. १९६१ मध्ये केवळ २५ राज्याच्या सहभागातुन उदयास आलेली चळवळ आज ११८ देशांना सामावुन घेतांना दिसते.[१] अलिप्ततावादी चळवळीने शितयुद्ध काळातील जागतिक संघर्ष व आक्रमकता शोषण व नववसाहतवादी प्रवृत्ती यांना पायबंद घालण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादी चळवळीची सैद्धांतीक मांडणी व प्रासंगिकता शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**गटनिरपेक्षता : सिद्धांत (सैद्धांतिक बाजू)**

येथे सर्वप्रथम आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे 'गटनिरपेक्षतें' चा उदय दुसऱ्या जागतिक महायुद्धोतर काळातील द्विध्रुवीय आंतरराष्ट्रीय तनावांच्या काळात झाला. त्यावेळी अमेरिका आणि सोविएत संघ या महाशक्ती जगातील लहान मोठ्या राज्यांना आपल्या बाजूस खेचण्याच्या प्रयत्नास लागले होते. यातून दोघांनी आपापले लष्करी गट उभे केले भारत हा मागासलेला देश नुकतेच त्यास स्वातंत्र्य मिळालेले. त्यामुळे महाशक्तींच्या गटबाजीत शामिल झाल्यास आपण अनावश्यक युद्धात ओढले जावू. ते आपणास परवडणार नाही. याशिवाय अन्य अनेक कारणांनी भारताने महाशक्तीच्या गटबाजींच्या राजकारणापासून दूर रहाण्याचा निर्णय घेतला भारताच्या या गटनिरपेक्षतेच्या धोरणास पुढे हळूहळू परिपूर्ण आशय प्राप्त होत गेला.

जगातील शक्तीगटांच्या राजकारणापासून दूर राहाण्याच्या भारताच्या धोरणासाठी 'गटनिरपेक्षता' हा शब्दप्रयोग करण्यास जरा उशीराच सुरूवात झाली. "१९४६-५० या काळात याच धोरणांस 'स्वतंत्र धोरण' (Independent Policy) म्हटले जात असे. १९५०-५८ या काळात या धोरणास 'शांतता क्षेत्र धोरण' (Peace Area Approach) म्हटले जाऊ लागले, आपल्या परराष्ट्रीय धोरणासाठी 'गटनिरपेक्षता' हे नांव प्रचारात आले ते १९५८ नंतर"[२]



Scanned with CamScanner